Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 24/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, अभिनेते राजा परांजपे

राजाभाऊ दत्तात्रय परांजपे ऊर्फ राजा परांजपे हे मराठी आणि हिंदी चित्रपट उद्योगातील एक भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता आणि लेखक होते. त्यांचा जन्म २४ एप्रिल १९१० रोजी झाला. त्यांचा चित्रपटसृष्टीत प्रवेश झाला तो संगीत विभागात 'ऑर्गन वादक' म्हणून! राजाभाऊंना संगीताचं उपजतच वेड होतं. हा वारसा त्यांना त्यांच्या आईकडून लाभला. विद्यार्थिदशेतच 'भारत गायन समाजा'च्या बापूराव केतकरांनी त्यांच्या संगीतवेडाला चांगलं वळण दिलं. नवनवी नाटके आणि सिनेमा बघण्याचे वेड त्यांना लागले. त्यांची अभिनयातील समज पाहून त्यांना 'लपंडाव' या नाटकात अचानक संधी मिळाली. त्या संधीचे त्यांनी चीज केले. पुढे केशवराव दात्ये यांनीच त्यांना 'सावकारी पाश' या चित्रपटातील भूमिका मिळवून दिली.

त्यानंतर भालजी पेंढारकर यांच्याकडे सहायक दिग्दर्शक म्हणून काम करताना त्यांच्याच काही चित्रपटांत त्यांनी अभिनयही केला. पण खऱ्या अर्थाने ते दिग्दर्शक झाले ते १९४८ मध्ये 'बलिदान'च्या माध्यमातून आणि यशाची बरसात झाली ती 'जिवाचा सखा' या चित्रपटाने. नाटकात उत्तम भूमिका करून प्रसिद्ध झालेल्या राजा परांजपेंचा अभिनेता म्हणून रसिकांच्या मनावर ठसा उमटला होता. त्यांच्या मराठी चित्रपटांव्यतिरिक्त चार हिंदी चित्रपटांनाही चांगले यश मिळाले. त्यातील 'दो कलियाँ' हा चित्रपट तर प्रचंड यशस्वी ठरला होता. 'पुढचं पाऊल', 'ऊन पाऊस', 'देवघर' यासारखे कलात्मक चित्रपट राजा परांजपे यांनी यशस्वी करून दाखवले होते. त्यांच्या 'हा माझा मार्ग एकला' या चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदकही मिळाले होते. अर्थात, हा बहुमान त्यांना दोनदा मिळाला होता. 'पाठलाग' या रहस्यप्रधान चित्रपटालाही राष्ट्रपतींचा पुरस्कार मिळाला होता. हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीत मैलाचा दगड मानला जातो. राजा परांजपे यांचे ९ फेब्रुवारी १९७९ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 24, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401